**जिल्हा परिषद, सातारा**
**सामान्य प्रशासन विभाग**
**साप्रवि/ई-निविदा सूचना ०१/२०१५**

जिल्हा परिषद, सातारा कडील गट -क व गट -ड संवर्गातील पदांच्या भरती प्रक्रियेसाठी खाली नमूद ऑनलाईन संगणकीय कामाकरीता

ई – निविदा सूचना

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा यांचेकडून खालील कामांच्या निविदा ई – निवीदा व्दि-लिफाफा (तांत्रिक व वित्तीय) पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| निविदा सूचना क्रमांक | कामाचा तपशील | ई-निवीदा फॉर्म फी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारांचे अर्ज व परीक्षा शुल्क ऑनलाईन स्वीकारणे, अर्ज तपासणे, त्यावर प्रक्रिया करुन संवर्गनिहाय व प्रवर्गनिहाय समांतर आरक्षणानुसार याद्या तयार करुन उपलब्ध करुन देणे, उमेदवारांचे प्रवेशपत्र (उमेदवारांचे फोटो व स्वाक्षरी सह) ऑनलाईन देणे, परीक्षा केंद्रनिहाय हजेरीपट (उमेदवारांचे फोटो व स्वाक्षरीसह) तयार करणे, उत्तरपत्रिका विहित नमुन्यामध्ये ओएमआर शिटवर कार्बन प्रतीसह छपाई करून देणे, उत्तरपत्रिकांचे (ओएमआर शिट) स्कॅनिंग करुन गुणांची प्रवर्गनिहाय यादी तयार करुन देणे, इ. अनुषंगिक भरती प्रक्रियेशी संबंधित कामे मुदतीमध्ये करणे. | १,०००/- | निवीदा दर प्रती उमेदवार सर्व करासह नमूद करावा |

**माहिती व अटी :-**

१) वरील कामांची निविदा प्रक्रिया संगणकावर ई निविदा प्रक्रियेव्दारे ऑनलाईन करण्यात येईल या निविदे संबंधित यापुढील सूचना/शुध्दीपत्रके इ. ऑनलाईन प्रसिध्द करण्यात येतील.

२) वरील कामाची संपूर्ण माहिती http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २१/०९/२०१५ रोजी सकाळी १४.०० पासून ते दिनांक २८/०९/२०१५ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत पाहता येईल व डाऊनलोड करता येईल.

३) वरील कामाची निवीदा प्रपत्र अ (Bid) http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २१/०९/२०१५ रोजी सकाळी १४.०० पासून ते दिनांक २८/०९/२०१५ सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत भरता येईल.

**निविदाबाबत आवश्यक सूचना :**

१) निविदा फॉर्म फी रु. १०००/- व बयाणा रक्कम रु. १२,०००/- ही NEFT/RTGS व्दारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.सातारा यांचे नांवे असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया प्रतापगंज पेठ सातारा शाखेतील खाते क्रमांक **33988774409** मध्ये ऑनलाईन भरणा करणेत यावी. सदर बँकेचा **IFSC Code no. SBIN 0000473** असा आहे.

२) सदर कामासाठीच्या आवश्यक अटी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इ. माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुण देण्यात येईल.

३) तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये निविदेतील अटी व शर्ती नुसार आवश्यक कागदपत्राच्या स्कॅन केलेल्या प्रति पिडीएफ फॉर्ममध्ये ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील.

४) वरील अ.क्र. ३ मध्ये नमूद कागदपत्रांची ई निविदेसोबत पूर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरविली जाईल.

५) पूर्ण माहिती भरलेले तांत्रिक लिफाफा क्र.१ ऑनलाईन पध्दतीने दि.२९/०९/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) जि. प. सातारा येथे उघडल्या जातील.

६) शक्य झाल्यास निविदा स्विकृती दिवशीच लिफाफा क्र.२ ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येईल.

७) कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा त्यातील कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

**८) घोषणापत्राचा नमूना :**

| घोषणापत्र | | |
|---|---|---|
| १. | निविदाकाराचे संपूर्ण नांव आणि संपूर्ण पत्ता (मराठी व इंग्रजीमध्ये) : | |
| २. | संस्था असल्यास प्राधिकृत इसमाचे नांव व पत्ता आणि संपर्क दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : | |
| ३. | संस्थेचा संपर्क दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : | |
| ४. | संस्था रजिस्ट्रेशन क्रमांक आणि वैध कालावधी : | |
| ५. | ऑनलाईन निविदेमधील कामांचा अनुभव आहे काय? : | |
| | ५ (अ) असल्यास त्याबाबतचा संपूर्ण तपशील द्यावा आणि कामे समाधानकारक पूर्ण केल्याबाबतची संबंधितांकडील प्रमाणपत्रे जोडावीत. : | |
| ६. | ओ.एम.आर. मशीन स्वतःचे आहे अगर भाडयाने घेणार आहे काय? : | |
| | ६ (अ) भाडयाने घेणार आहे त्याचा कोणांकडून भाडयाने घेणार आहे त्याचा तपशील द्यावा व त्याचे रुपये १००/- च्या बाँडपेपरवरील संमतीपत्र निविदेसोबत जोडावे : | |
| ७. | कामासाठी वापरण्यात येणाऱ्या ओ.एम.आर. मशिनचे स्पेशिफिकेशन नमुद करावे : | |
| ८. | पॅन क्रमांक : | |
| ९. | स्कॅनर मशिनचा वेग प्रति मिनिट किती आहे? : | |
| १०. | निविदा धारकाचे संगणक संच व प्रिंटर्स किती आहेत? व सदर कामाची माहिती असणारे संगणक ऑपरेटर्स किती आहेत? | |
| ११. | निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला विनाअट मान्य आहेत. | |

**स्थळ :**
**दिनांक :**

**निविदाकाराचे संपूर्ण नांव व सही**
**(रबर स्टॅपसह)**

**सामान्य प्रशासन विभाग,**
**जिल्हा परिषद, सातारा**
**ई टेंडर पध्दतीने दर मागणी बाबत**

**अटी व शर्ती :-**

१. निविदा फॉर्म फी रु. १०००/- व बयाण रक्कम रु. १२,०००/- NEFT/RTGS व्दारे ऑनलाईन भरणा कराव्यात. तसेच उर्वरीत अनामत रक्कम त्यांना देय असलेल्या रकमेवर ५% प्रमाणे अनामत रक्कम बिलातून वसुल केली जाईल.

२. निविदा दर प्रती उमेदवार असा सर्व करासह नमूद करणे आवश्यक आहे.

३. ज्यांची निविदा नामंजूर करणेत आलेली आहे. अशा निविदाधारकांची बयाणा रक्कम निविदा पूर्ण झाल्यानंतर NEFT/RTGS व्दारे ऑनलाईन संबंधीताचे खात्यावर जमा करणेत येईल.

४. ठेकेदारास आपल्यावतीने सदरचे काम दुसऱ्या व्यक्तीस/संस्थेस देता येणार नाही वा एजंट नेमता येणार नाही.

५. काम करताना झालेल्या नुकसानीस संबंधित ठेकेदार जबाबदार राहील. याबाबत कोणतीही नुकसान भरपाई देय राहणार नाही.

६. या कामाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा तथा सदस्य जिल्हा निवड समिती जिल्हा परिषद सातारा यांना वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

७. कामाचा ठेका मंजूर झाल्यानंतर व कार्यारंभ आदेश काढल्यानंतर निविदाकाराने काम नाकारल्यास अथवा गोपनीयतेचा भंग केल्यास अथवा काम अर्धवट अवस्थेमध्ये सोडून दिल्यास त्यांचे विरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येईल. तसेच झालेला खर्च सव्याज वसूल करण्यात येईल.

८. निविदेतील कामे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा येथे नेमून दिलेल्या ठिकाणी करावयाची आहेत. गोपनीयतेच्या दृष्टीकोनातून या कामासाठी ठेकेदाराकडून नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे व त्यांचे संपूर्ण पत्ते आगाऊ देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

९. तांत्रिक दोषामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे काम बिनचूक व समाधानकारक न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा तथा सदस्य जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद सातारा यांनी काम समाधानकारक असल्याचा दाखला दिल्यानंतर ठेकेदारास देयकाची रक्कम आदा केली जाईल.

११. निविदाकार व त्याचे कर्मचारी कोणत्याही राजकीय पक्षांशी संबंधित असता कामा नये.

१२. ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हान्स) दिले जाणार नाही.

१३. कामाकरीता वापरण्यात येणारे ओ.एम.आर. स्कॅनिंग मशिन आणि कागद उत्तम दर्जाचे तसेच मान्यताप्राप्त कंपनीचे असणे आवश्यक आहे.

१४. नेमून दिलेले काम मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक राहील, अन्यथा निविदाधारकाच्या देय रकमेतून ३० टक्के रक्कम वजा करण्यात येईल.

१५. सदर निविदेचा कालावधी ३० जून २०१६ पर्यंत वैध राहील.

१६. स्कॅनर मशिनचा उत्तरपत्रिका स्कॅन करण्याचा वेग किमान प्रती मिनिट २० इतका असणे आवश्यक आहे.

१७. उत्तरपत्रिका स्कॅन करताना वापरण्यात येणारे स्कॅनर व संगणक हे उत्तम दर्जाचे आणि आधुनिक तंत्रज्ञान असणे आवश्यक आहे.

१८. निविदाधारकाने उमेदवारांचे संख्येनुसार आवश्यक तेवढे संगणक संच व प्रिंटर्स सदर कामाची माहिती असणाऱ्या संगणक ऑपरेटर्ससह उपलब्ध करणे आवश्यक आहे. तसेच सदर ऑनलाईन कामासाठी इंटरनेटची सुविधा असणेही आवश्यक आहे.

१९. उमेदवारांनी अर्ज कसा भरावा, याबाबतची माहिती वेबसाईटवर देणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी आल्यास त्यासाठी संपर्क क्रमांक (हेल्प लाईन क्रमांक) देणे आवश्यक राहील.

२०. निविदाधारकाने ऑनलाईन प्राप्त उमेदवारांच्या अर्जाची संख्या तसेच माहिती दररोज लेखी या

कार्यालयाकडून पुरविण्यात येणाऱ्या विहित नमून्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा कार्यालयास (सामान्य प्रशासन विभाग) सादर करणे बंधनकारक आहे.

२१. उमेदवारांची ऑनलाईन माहिती करप्ट न होणे, Data security आणि Data Safety याबाबत निविदाधारकाने आपले स्तरावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. तांत्रिक सदोषामुळे माहिती नष्ट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निवीदाधारकावर राहील. इंटरनेटव्दारे ऑनलाईन प्रक्रिया राबवत असताना Cyber security, Copyright, TRIPS, Patent, Software License बाबतची जबाबदारी निविदाधारकाची राहील. सदर बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास निविदाधारक हे स्वतः जबाबदार राहतील. याबाबतीत जिल्हा निवड समिती कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

२२. निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जि. प. सातारा यांनी ठरवून दिलेल्या विहीत नमुन्यात रुपये १००/- (रुपये शंभर मात्र) इतक्या रकमेच्या स्टॅप पेपरवर करारनामा लिहून देणे बंधनकारक राहील.

२३. वरील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास अथवा विहीत मुदतीत काम समाधानकारक व बिनचूक न झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन संबंधित ठेकेदारावर फौजदारी कारवाई करण्यात येईल. अशा परिस्थितीत कामाचे गांभीर्य ओळखून अन्य व्यक्ती/ संस्थेकडून काम पूर्ण केले जाईल व त्याबाबतच्या देयकाची संपूर्ण रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसूल केली जाईल.

२४. निविदा दाखल केलेल्या कंत्राटदारास निविदेसंदर्भात न्यायालयीन दावा दाखल करावयाचा झाल्यास सदर दाव्याचे कार्यक्षेत्र सातारा हे राहील. कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबतीत विवाद उद्‌भवल्यास, करार नामंजूर करणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटी व शर्ती बदलण्याचा अथवा रद्द करण्याचा तसेच निविदेचा वैध कालावधी वाढविण्याचा अगर कमी करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा तथा सदस्य, जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, सातारा यांनी राखून ठेवलेला आहे.

२५. या कार्यालयाकडून उत्तरपत्रिका स्कॅनिंग करण्याकरीता निश्चित करणेत येणाऱ्या जागी २४ तास सी.सी.टी.व्ही. कॅमेराची व्यवस्था करणे आवश्यक राहील व त्या बाबतचे संपूर्ण फुटेज या कार्यालयाकडे देणे बंधनकारक राहील.

**२६. तांत्रिक लखोटा (लखोटा क्र.१)** मध्ये खालील बाबींचा समावेश असलाच पाहिजे.

अ) निविदा अटी व शर्ती विना अट मान्य असलेबाबतचे अधिकृत घोषणापत्र (विहित नमुन्यात)

ब) RTGS/NEFT व्दारे जमा केलेल्या रकमेबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र Unique Transaction Registration (UTR) क्रमांक नोंदवून स्कॅन केलेल्या दोन प्रती

क) संस्था नोंदणीकृत असलेचे प्रमाणपत्र

ड) पॅन कार्डची सांक्षाकित प्रत व मागील ३ वर्षाचे आयकर विभागाकडील १६ नं.विवरणपत्र.

इ) यापूर्वी संस्थेने जिल्हा परिषद अथवा शासकीय कार्यालयाकडील किमान ५००० अथवा जादा उमेदवारांचे ऑनलाईन भरती प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केले बाबतचे प्रमाणपत्र

ई) ओ.एम.आर. स्कॅनिंग मशीन स्पेशिफीकेशन प्रमाणपत्र

फ) संगणक, प्रिंटर व ऑपरेटर यांची माहिती (उदा. संगणक, प्रिंटर, स्कॅनर संख्या, मॉडेल वर्ष, ऑपरेटर संख्या इ.)

वरील अ.क्र. (अ) ते (फ) ही कागदपत्रे लखोटा क्र. १ मध्ये (PDF फॉर्म मध्ये) समाविष्ट करणेत यावीत.

**२७. दराचा (लखोटा क्र. २)**

अ) Bid of Quantity ची Excel फाईल मध्ये कंपनीचे नाव व आवश्यक ते दर नमूद करुन अपलोड करणेचा आहे.